# 'डेक्कन'चा शंभर टक्के निकाल

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभाग यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या 'सर्टिफिकेट कोर्स इन व्हॅल्युएशन ऑफ इम्मुव्हेबल प्रॉपर्टीज' या अभ्यासक्रमाच्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, कोल्हापूर या संस्थेचा निकाल शंभर टक्के लागला आहे. पुढील बॅचसाठी इच्छुकांनी संस्थेशी संपर्क साधावा. डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, ट्रेड सेंटर मागील बाजू स्टेशन रोड येथे संपर्क साधावा.

सकाळ

# विद्यापीठ समितीचे चौगुले सदस्य



एम. एल. चौगुले

गडहिंग्लज : शिवाजी विद्यापीठ अग्रणी महाविद्यालय शिखर समिती सदस्यपदी श्री रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांची नियुक्ती झाली. बँकिंग क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीची नोंद घेऊन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी ही नियुक्ती केली. विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी चौगुले यांना नियुक्ती पत्र पाठविले आहे. चौगुले यांनी रवळनाथ संस्थेच्या माध्यमातून २५०० शासकीय-निमशासकीय मध्यमवर्गीय नोकरदारांना घरकूल बांधण्यासाठी सुलभ अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले आहे. संस्थेच्या विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रमात त्यांनी भरीव योगदान दिले आहे. गडहिंग्लज भागातील ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी त्यांनी झेप अॅकॅडमी नावाने स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रही सुरू केले आहे.

Kolhapur, Kolhapur-Today
22/04/2019 Page No. 2